# प्रेसनोट दि.१४/०४/२०१९

## भारती विद्यापीठ पोलीस ठाणे,पुणे

## हरविलेल्या मुलास त्याच्या वडीलांचा शोध घेवुन त्यांचे ताब्यात दिले.

दि. १३/०४/२०१९ रोजी भारती विद्यापीठ पोलीस ठाण हद्दीतील दत्तनगर पोलीस चौकी अंमलदार सपोफौ शिंदे, दत्तनगर मार्शल पोना पवार असे पेट्रोलिंग करीत असताना वय-०८ वर्षे वयाचा मुलगा संशयितरित्या मिळुन आल्याने त्या त्याचे नांव व पत्ता विचारता त्याने त्याचे नाव साई सुनिल सरगे असुन तो मुळ सोलापुर येथील रहाणार असुन तो त्याचे वडीलांसह शाळेस सुट्टी लागल्याने पुणे येथे फिरावयास आलेला असल्याचे सांगुन पुणे येथील पत्ता माहित नसल्याचे सांगितले असता, नमुद पोलीस कर्मचाऱ्यांनी पोलीस चौकीस आणुन पोहवा २४६९ खुटवड, पोना २७१३ कदम यांचेसह नमुद बिट मार्शलनी मुलाचे सांगणे प्रमाणे तो चालत आलेल्या शनिनगर चौक, दत्तनगरचौक, जांभुळवाडी, चंद्रभागा चौक या भागात पेट्रोलिंग करुन त्या मुलाचे आई-वडीलांबाबत चौकशी केली असता, तसेच बिट मार्शलच्या ओळखीच्या लोकांच्या वॉट्सअपग्रपवर नमुद मुलाचा फोटो पाठवुन सदर लहानमुलांबाबत माहिती मिळाल्यास पोलीस ठाणेस कळविण्याची विनंती केली.

त्या दरम्यान इमस सुनिल वागबर सरगे, वय-३६ वर्षे, धंदा-नारळ विक्री, रा. सर्वे नं. १४, शांतीनगर, धनकवडी, पुणे यांनी समक्ष पोलीस चौकीस येऊन सांगितले की, सदरचा मुलगा हा माझा आहे. त्यास आमचे मुळ गांव सोलापुरहुन शाळेस सुट्टी लागल्याने पुण्यास फिरण्यासाठी घेऊन आलेलो आहे. तो एकटाच चालत-चालत दत्तनगर भागात येऊन पोहोचलेला आहे. नमुद हरविलेल्या मुलाचे नातेवाईकांबाबत खात्री करुन त्यास त्यांचे ताब्यात दिले.

सदर कामगीरीबाबत चुकलेल्या मुलाचे मामा श्री.बाळु अंकुश वास्ते यांनी समाधान व्यक्त करुन पोलिसांचे आभार मानलेले आहे.

(विष्णु शं. पवार)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे शहर

